दैनिक गोदातीर दिनांक 01/12/2025

# बँक खात्यातून हॅकरने पळविलेले ९४ हजार रुपये सायबर व मरखेल पोलिसांमुळे मिळाले परत



**नांदेड (प्रतिनिधी)**– देगलूर तालुक्यातील मरखेल पोलिसांनी सायबर सेलच्या माध्यमातून ऑनलाईन फसवणूक झालेले ९४ हजार रुपये तक्रारदाराला परत मिळवून दिले.

देगलूर तालुक्यातील टाकळी (ज) महेश बळीराम दुमने यांचा किराणा व्यवसाय आहे. त्यांनी HI-BOX या ॲपवर गुंतवणुक केली तर २४ तासात १२ टक्के फायदा मिळतो ही जाहीरात पाहिली. त्यानुसार त्यांनी १ हजार रुपये गुंतवणूक केली. २४ तासात त्यांना १२० रुपये फायदा झाला. त्यानंतर त्यांनी ९४ हजार रुपयांची गुंतवणूक पण त्याचा फायदा मिळाला नाही. तेंव्हा त्यांनी सायबर संकेतस्थळावर तक्रार नोंदवली.

हा गुन्हा मरखेल पोलिसांकडे आला. तेथील सहाय्यक पोलीस निरिक्षक रवि हुंडेकर आणि पोलीस उपनिरिक्षक विलास पवार यांनी HOLD/ LIEN या संदर्भाने बँकांना ईमेल करून महेश डुमने यांची ९४ हजार रुपये रक्कम परत मिळवून दिली.